# Washim District Police

**Nature of work** :- Washim Poilce CCTNS Third Prize

**Police Station** :- SP Office, Washim

**Date of Good Work Done** :- 18/09/2017

## Brief of the work done :-

In Maharashtra interdistrict compitation regarding CCTNS work was took place in this compitation our washim poilce had earn third prize in CCTNS data feeding work. This prize was given by Hon'ble Director General of Police of Maharashtra Mr. Satish Mathur and received by Superintendent of Poilce, Washim Mrs. Mokshada Patil Madam.

This event is come true due to guidance of Hon'be SP Mrs. Mokshada Patil madam and Addl. SP and also CCTNS Nodal officer Mrs. Swapna Gore team led by Cyber Cell, PI Ravindra Deshmukh after continuously taking efforts. of the team includes NPC Pradip Dakhore, PC Amol Kalmundale, PC Prashant Chaudhari, LPC, Ashivini Pannase, LPC Komal Gadhe and other Admin team of Poilce Station.

## Image:

# उत्कृष्ट कार्याबद्दल पोलिस अधीक्षक पाटील यांचा गौरव

## सीसीटीएनएस कामकाजात वाशीम जिल्ह्यास उत्कृष्ट पारितोषिक



वाशीम : पोलिस अधीक्षक मोक्षदा पाटील यांचा गौरव करताना पोलिस महासंचालक. (सकाळ छायाचित्रसेवा)

**वाशीम, ता. २१ :** उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल नाशिक येथे सोमवारी (ता.१८) राज्याचे पोलिस महासंचालकांच्या हस्ते वाशीम जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षक मोक्षदा पाटील यांना गौरविण्यात आले.

संपूर्ण महाराष्ट्र राज्यात १ जानेवारी २०१६ पासून पोलिस विभागात सीसीटीएनएस प्रणालीची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. सदरहू प्रणाली अंतर्गत पोलिस विभागात चालणारी दैनंदिन कामे, गुन्हे, अन्वेषण, न्यायालयीन कामकाज इत्यादी ऑनलाइन करण्यात आले आहे. वाशीम जिल्ह्यात मुलभुत सुविधांचा असलेला अभाव, ग्रामीण भागातील विजेचे भारनियमन, इंटरनेट कनेक्टिव्हिटी मधील असुविधा इत्यादी प्रतिकूल बाबीवर मात करत जिल्हा पोलिस अधीक्षक मोक्षदा पाटील यांनी वाशीम जिल्ह्याचा पदभार स्वीकारल्यानंतर सीसीटीएनएस कामकाजावर प्राधान्याने लक्ष केंद्रित करून यामध्ये जास्तीत जास्त सुधारणा घडवून आणल्या सदरहू कामकाज पाहणारे पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित केले. पोलिस स्टेशन भेटी दरम्यान सीसीटीएनएस कामकाज आढावा घेऊन प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात आले. याचीच फलश्रुती म्हणून संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून उत्कृष्ट ठरलेल्या पहिल्या तीन जिल्ह्यामधून वाशीम जिल्हा तिसऱ्या क्रमांकाचा मानकरी ठरला आहे. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल सोमवारी (ता.१८) नाशिक येथे आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे पोलिस महासंचालकांच्या हस्ते वाशीमच्या पोलिस अधीक्षक मोक्षदा पाटील यांचा पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. सीसीटीएनएस कार्यप्रणाली यशस्वी करण्यासाठी अपर पोलिस अधीक्षक श्रीमती स्वप्ना गोरे, सायबर सेलचे पोलिस निरीक्षक रवींद्र देशमुख, पोलिस ना.प्रदीप डाखोरे व कर्मचारी अमोल काळमुंदळे, अश्विनी पन्नासे, कोमल गाढे, प्रवक्ते राजेश राजेश शिकवाल यांनी अथक परिश्रम घेतले. त्यांचे जिल्हा पोलिस अधीक्षक मोक्षदा पाटील यांनी कौतुक केले.